0 8 JUL 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'केईए'च्या कौशल्य केंद्राला मान्यता देऊ

## कुलगुरू डॉ. कामत : इंजिनिअरिंग असोसिएशनशी सामंजस्य करार करणार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राला नवनिर्मितीची व कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. जागतिक स्तरावरील गुणवत्ता मानांकनाचा सातत्याने अभ्यास केला पाहिजे. बाजारपेठेची गरज ओळखण्यासाठी 'मार्केटिंग स्किल' वाढविण्यासाठी भर दिला पाहिजे. अशा पध्दतीने कौशल्य विकास होण्यासाठी कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन (केईए) व शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार केला जाईल, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी आज दिली. तसेच 'केईए'कडून सुरू केल्या जाणाऱ्या कौशल्य विकास केंद्राला शिवाजी विद्यापीठाशी संलग्न करून त्याला मान्यता देऊ, असेही त्यांनी सांगितले.



कोल्हापूर : 'केईए'च्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रसन्न तेरदाळकर, श्रीकांत दुधाने, कमलाकांत कुलकर्णी, नितीन वाडीकर उपस्थित होते.

शिवाजी उद्यमनगर येथील कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या सभागृहात 'केईए'च्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त घेतलेल्या कार्यक्रमात ते 'उद्योग शिक्षण, समन्वय, नवतंत्रज्ञान व भविष्यातील औद्योगिक संधी' या विषयावर पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी 'केईए'चे अध्यक्ष उद्योजक कमलाकांत कुलकर्णी होते. उपाध्यक्ष श्रीकांत दुधाने, सचिव नितीन वाडीकर, कोषाध्यक्ष प्रसन्न तेरदाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

### 'सकाळ'च्या बातमीची कुलगुरूंकडून दखल

**'सकाळ'मध्ये प्रसिध्द झालेल्या 'इंजिनिअरिंग असोसिएशनचे फाउंड्रीचे नवे अभ्यासक्रम' या वृत्ताची कुलगुरूंनी आपल्या भाषणात उल्लेख केला. तसेच यानुसार हे अभ्यासक्रम विद्यापीठाशी संलग्न करू, असे ही ते म्हणाले.**

डॉ. कामत म्हणाले, 'रोजगारासाठी कोल्हापूरबाहेर जाणाऱ्या तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी 'फिनिशिंग स्कूल'वर भर दिला पाहिजे. येथील उद्योगांमधील नवनिर्मितीला 'पेटंट' मिळवून देण्यास विद्यापीठ सहकार्य करेल. यामाध्यमातून कोल्हापूरचे उत्पादन जागतिक पातळीवर पोहोचेल. तसेच हरित अर्थव्यवस्थेसाठी सर्वांनी एकत्र येऊन याची रूपरेषा ठरवूया.' 'केईए'चे अध्यक्ष कुलकर्णी म्हणाले, 'भविष्यात कौशल्य विकास, नवोन्मेष, स्टार्टअप्स, प्रशिक्षण, संशोधन सहकार्य आणि उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी असोसिएशन प्रभावी भूमिका बजावेल.'

यावेळी जयदीप चौगले, संजय अंगडी, बाबासाहेब कोंडेकर, अतुल आरवाडे, हर्षद दलाल, अमर करांडे, जयदीप मांगोरे, अशोक जाधव, संजय शेटे, मोहन कुशिरे, सुरेंद्र जैन, अभिजित अवसरे, नलिनी नेने, हिंदूराव कामते, अनिल कुडचे, चंद्रकांत चोरगे, प्रदीप कापडिया, उद्योजक उपस्थित होते.

08 JUL 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ-कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनमध्ये सामंजस्य करार

## कुलगुरू डॉ. कामत; कौशल्य विकास अभ्यासक्रम अन् 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' योजना राबवणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूरचे उद्योग क्षेत्र आणि विद्यापीठ यांच्यात समन्वय निर्माण होण्याची गरज असून त्यासाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनसोबत सामंजस्य करार करणार असल्याची घोषणा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केली.

कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. कामत म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाच्या माध्यमातून आपण ७० स्टार्टअप्स सुरू करण्यास सहकार्य केले, ज्यातील अनेक आता यशस्वी उद्योग म्हणून प्रस्थापित झाले आहेत.



**कोल्हापूर : कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत. शेजारी असोसिएशनचे अध्यक्ष कमलाकांत कुलकर्णी, उपाध्यक्ष श्रीकांत दुधाणे, सचिव नितीन वाडीकर, प्रसन्न तेरदाळकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

### 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' योजना

दीर्घ अनुभवी व्यक्तींच्या अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना व्हावा, यासाठी कोल्हापुरात 'प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस' ही योजना सुरू करण्यात येणार आहे. परदेशात विद्यापीठे आणि स्थानिक उद्योग मिळून ज्या पद्धतीने विकास साधतात, तोच पॅटर्न आता आपण कोल्हापुरात राबवणार आहोत, असे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले.

हेच मॉडेल आता आपण कोल्हापुरातही राबवणार आहोत. हा करार आणि योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी एक 'स्पेशल पर्पज व्हेईकल' कंपनी स्थापन करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. असोसिएशनचे अध्यक्ष कमलाकांत कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात असोसिएशनच्या ८० वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. प्रदीप व्हरांबळे यांनी सूत्रसंचालन केले. सचिव नितीन वाडीकर यांनी आभार मानले. व्यासपीठावर उपाध्यक्ष श्रीकांत दुधाणे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

0 8 JUL 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील तलाव जलसमृद्धीने नटले

## दमदार पावसामुळे वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर शहर व परिसरात गेले काही दिवस सुरू असलेल्या दमदार पावसामुळे शिवाजी विद्यापीठ परिसरातील जलस्रोत वेगाने भरू लागले असून, परिसरातील तलाव, विहिरी आणि शेततळ्यांच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसराला पुन्हा एकदा हिरवाईची आणि जलसमृद्धीची नवी झळाळी प्राप्त झाली आहे.

विद्यापीठातील भाषा भवन परिसरातील 'शिव जलाशय' आणि संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाजवळील तलाव यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. परिसरात पावसाचे पाणी साठविण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या चरींमधून वाहत येणारे पाणी भाषा भवन तलावात धबधब्याप्रमाणे कोसळत असल्याने तेथील दृश्य विशेष आकर्षण ठरत आहे. सध्या ढगाळ वातावरण, हिरवाईने नटलेला परिसर, जलाशयांतील वाढता पाणीसाठा आणि तलावात धबधब्यांप्रमाणे कोसळणारे पाणी, यामुळे विद्यापीठ परिसराने रमणीय रूप धारण केले आहे. निसर्गप्रेमी, विद्यार्थी आणि विद्यापीठातील कर्मचारी या नयनरम्य दृश्याचा आनंद घेत आहेत.



शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाकडील तलाव पावसामुळे जलद गतीने भरू लागला आहे.

पावसामुळे जलाशयांतील पाणीसाठा दिवसागणिक वाढत असून, परिसरातील वृक्षसंपदा आणि जैवविविधतेलाही त्याचा मोठा लाभ होत आहे. जलसंवर्धनाच्या दृष्टीने विद्यापीठाने उभारलेल्या विविध संरचनांमुळे पावसाच्या प्रत्येक थेंबाचे प्रभावी संधारण होत असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले आहे. नैसर्गिक जलस्रोत भरू लागल्याने भूजलपातळी वाढण्यास मदत होणार असून, येत्या काही दिवसांत पावसाचा जोर कायम राहिल्यास हे जलाशय लवकरच पूर्ण क्षमतेने भरणार आहेत.

महा न्यूज & व्ह्यूज


वामाक्षी
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimak Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# भारत क्लायमेट सत्याग्रह यात्रेनिमित्त विद्यापीठात हवामान जनजागृती कार्यशाळा

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाचे स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, द इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनियर्स (इश्रे) आणि युआन यांच्या संयुक्त विद्यमाने ''भारत क्लायमेट सत्याग्रह यात्रा''अंतर्गत येत्या गुरूवारी (दि. ९) दुपारी २.३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात हवामान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेसाठी प्रा. चेतन सिंह सोलंकी, सोलर मॅन ऑफ इंडिया तथा फाउंडर, एनर्जी स्वराज हे प्रमुख अतिथी व प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. हवामान बदल, शाश्वत जीवनशैली, ऊर्जा



स्वावलंबन आणि स्वेच्छेने हवामान कृती (Voluntary Climate Action) या विषयांवर सोलंकी मार्गदर्शन करणार आहेत. कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित असतील.

सध्या जागतिक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये, शिक्षकांमध्ये आणि नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यशाळेसाठी विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, अधिकारी, कर्मचारी तसेच पर्यावरणप्रेमी नागरिकांनी या मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी केले आहे.

0 8 JUL 2026
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्या हवामान जनजागृती कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'भारत क्लायमेट सत्याग्रह यात्रा' अंतर्गत गुरुवारी (ता. ९) हवामान जनजागृती कार्यशाळा होत आहे. 'सोलर मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे प्रा. चेतन सिंह सोलंकी कार्यशाळेत हवामान बदल, शाश्वत जीवनशैली आणि ऊर्जा स्वावलंबन विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. राजर्षी शाहू सभागृहात दुपारी अडीच वाजता कार्यशाळेस सुरुवात होईल. स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, द इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनियर्स (इश्रे) आणि युआन यांच्या संयुक्त विद्यमाने ती होत आहे. विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, अधिकारी, कर्मचारी, पर्यावरणप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी केले आहे.

0 8 JUL 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उद्या हवामान जनजागृती कार्यशाळा

**कोल्हापूर :** भारत क्लायमेट सत्याग्रह यात्रेनिमित्त शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, 'इश्रे' व सहयोगी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. ९) दुपारी २.३० ते ४ या वेळेत राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये हवामान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन केले आहे. 'सोलर मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे प्रा. चेतन सिंह सोळंकी हे मार्गदर्शन करणार आहेत. हवामान बदल, शाश्वत जीवनशैली, ऊर्जा स्वावलंबन आणि स्वेच्छेने हवामान कृती या विषयावर ते विचार मांडणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. आर. के. कामत असतील. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यशाळेस उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी संचालक प्रा. डॉ. अजित कोळेकर यांनी केले आहे.

08 JUL 2026
सकाळ

# डॉ. एच. सी. वर्मा यांचे उद्या विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ तथा पद्मश्री डॉ. एच. सी. वर्मा यांचे शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (ता. ९) विशेष व्याख्यान होत आहे. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी अकरा वाजता व्याख्यानास सुरुवात होईल. भौतिकशास्त्र अधिविभाग व इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स (आयएपीटी) सब रिजनल कौन्सिल ०८ डी यांच्यातर्फे व्याख्यान होत आहे. डॉ. वर्मा भौतिकशास्त्राचा अभ्यास सुलभ व संकल्पनात्मक पद्धतीने कसा करावा, याबाबत मार्गदर्शन करणार असून, भौतिकशास्त्रातील मूलभूत संकल्पनांवरही ते प्रकाश टाकतील.

0 8 JUL 2026

पुढारी

# डॉ. एच. सी. वर्मा यांचे उद्या विद्यापीठात व्याख्यान


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. एच. सी. वर्मा (आयआयटी, कानपूर) यांचे विशेष व्याख्यान गुरुवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. विद्यापीठाचा भौतिकशास्त्र अधिविभाग आणि 'इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स' सब रिजनल कौन्सिल ०८ डी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. आर. के. कामत असणार आहेत. भौतिक शास्त्रातील मूलभूत संकल्पनांवर ते प्रकाश टाकणार आहेत. व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे व आयएपीटी संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

0 8 JUL 2026 जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संवाद कौशल्य हीच प्रभावी प्रशासनाची गुरुकिल्ली : डॉ. आलोक जत्राटकर



उद्‌बोधन वर्गात मार्गदर्शन करताना डॉ. आलोक जत्राटकर. डॉ. कृष्णा पाटील, विनय शिंदे आणि दिलीप मोहाडीकर.

**जनप्रवास : कोल्हापूर**

प्रशासकीय कामकाजात प्रभावी संवाद कौशल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपण ज्या संस्थेमध्ये कार्यरत आहोत, त्या संस्थेची उद्दिष्टे, कार्यपद्धती, नियम आणि विविध उपक्रमांची अचूक माहिती प्रत्येक कर्मचाऱ्याला असणे आवश्यक आहे. विद्यार्थी, पालक आणि अभ्यागतांशी सकारात्मक व परिणामकारक संवाद साधण्याची क्षमता ही प्रभावी प्रशासनाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने समूह जनजागृती कार्यक्रम या अंतर्गत विद्यापीठातील हंगामी रोजंदारी कर्मचाऱ्यांसाठी'प्रशासकीय साक्षरता आणि जीवन कौशल्ये'या विषयावरील उद्‌बोधन वर्गाचे आयोजन मानव्यविद्या सभागृहात शनिवारी (दि. ४) करण्यात आले होते. यावेळी'शिवाजी विद्यापीठ आणि संवाद कौशल्य'या विषयावर डॉ. जत्राटकर मार्गदर्शन करीत होते. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी'प्रशासकीय साक्षरता आणि जीवन कौशल्ये'या विषयावर प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी मार्गदर्शन केले. कोर्स को-ऑर्डिनेटर नाझिया मुल्लाणी यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती उपस्थित कर्मचाऱ्यांना दिली.डॉ. संजय चोपडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. दयानंद गावडे यांनी परिचय करून दिला. डॉ. संगीना माळी यांनी सूत्रसंचालन केले,तर सुमन लोहार यांनी आभार मानले.

0 8 JUL 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ८२६ अभ्यासक्रमांचे निकाल

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवार दि.७ रोजी १० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ८२६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. मंगळवारी विविध ८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ५ परीक्षा केंद्रावर पार पडल्या आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद करण्यात आली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

0 8 JUL 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
with CGPA 3.52

## MBA (Distance) प्रवेश सूचना

### MBA (Distance) फेर प्रवेश परीक्षा

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी MBA (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (रिक्त जागाकरिता) फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance Exam) घेण्यात येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची **अंतिम मुदत दि. २२/०७/२०२६** आहे.

**फेर प्रवेश परीक्षा** - २६/०७/२०२६

**ठिकाण** - दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, कोल्हापूर

### MBA-CET उत्तीर्ण थेट प्रवेश

MAH-CET, ATMA अथवा भारत सरकारच्या कोणत्याही वैधानिक संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना MBA (Distance Mode) अभ्यासक्रमास थेट प्रवेश घेता येईल. (वरीलप्रमाणे फेर प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही) प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला अवश्य भेट द्या. https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx

जा. क्र. दूरशिक्षण/४३२
दि. ०८/०७/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

तसेच इतर **बी. ए., बी. कॉम., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. (गणित) (Distance Mode)** या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू आहेत.

0 8 JUL 2026
सकाळ

Estd : 1962
'A++' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## MBA (Distance) प्रवेश सूचना

### MBA (Distance) फेर प्रवेश परीक्षा

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी MBA (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (रिक्त जागाकरीता) फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance Exam) घेण्यात येत आहे. त्या करीता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि.२२/०७/२०२६ आहे.

**फेर प्रवेश परीक्षा - २६/०७/२०२६**

ठिकाण - दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, कोल्हापूर

### MBA-CET उत्तीर्ण थेट प्रवेश

MAH-CET, ATMA अथवा भारत सरकारच्या कोणत्याही वैधानिक संस्थे मार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना MBA (Distance Mode) अभ्यासक्रमास थेट प्रवेश घेता येईल. (वरीलप्रमाणे फेर प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही) प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला अवश्य भेट द्या. https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx

जा.क्र.दूरशिक्षण/४३२
दि. ०८/०७/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

तसेच इतर बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) **(Distance Mode)** या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू आहेत.

0 8 JUL 2026
लोकमत

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## MBA (Distance) प्रवेश सूचना

### MBA (Distance) फेर प्रवेश परीक्षा

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी MBA (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष (रिक्त जागाकरिता) फेर प्रवेश परीक्षा (Re-Entrance Exam) घेण्यात येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची **अंतिम मुदत दि. २२/०७/२०२६ आहे.**

**फेर प्रवेश परीक्षा - २६/०७/२०२६**

ठिकाण - दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, कोल्हापूर

### MBA-CET उत्तीर्ण थेट प्रवेश

MAH-CET, ATMA अथवा भारत सरकारच्या कोणत्याही वैधानिक संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना MBA (Distance Mode) अभ्यासक्रमास थेट प्रवेश घेता येईल. (वरीलप्रमाणे फेर प्रवेश परीक्षा देण्याची आवश्यकता नाही.) प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji.ac.in या ई-मेल वरती संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला अवश्य भेट द्या. https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx

जा.क्र. दूरशिक्षण/४३२
दि. ०८/०७/२०२६

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव

तसेच इतर बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम. कॉम., एम.एस्सी. (गणित) **(Distance Mode)** या अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू आहेत.

08 JUL 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## ज्ञान-विज्ञान

डॉ. व्ही.एन. शिंदे

# इच्छा असेल तर..!

**वय वर्षे तीन असलेला एक मुलगा वडिलांचे बोट धरून त्यांच्या कामाच्या ठिकाणी गेला होता. वडील मजुरांना त्यांचा पगार देत होते. त्यावेळी त्यांच्या हिशोबातील चूक तो मुलगा सांगू लागला. वडिलांनी त्याकडे दुर्लक्ष केले, मात्र मुलगा हेका सोडत नव्हता. अखेर त्यांनी आपला हिशोब पुन्हा तपासला आणि त्यामध्ये खरच चूक झाल्याचे लक्षात आले. लहानग्यांचा गणित विषय नावडीचा असताना, तीन वर्षे वय असताना आपल्या गणिती कौशल्याची झलक दाखवणारा आणि आपली वेगळी ओळख निर्माण करणारा संशोधक म्हणजे जोहान कार्ल फ्रेडरिक गॉस.**

गॉस यांचा जन्म जर्मनीतील ब्रुन्सविक शहरात ३० एप्रिल १७७७ रोजी झाला. घरच्या गरिबीमुळे गॉस यांचे वडील पडेल ते काम करत. थोडेफार पैसे जमा केल्यानंतर त्यांनी ठेकेदारी सुरू केली. दर आठवड्याला ते कामगारांना मोबदला देत. असे वेतन देताना गॉस यांनी वडिलांच्या हिशोबातील चूक सांगितली. त्यापुढे ते पाच वर्षांचे होईपर्यंत प्रत्येक आठवड्याचा हिशोब वडिलांना तपासून देत. पाचव्या वर्षी त्यांनी गावातील सेंट कॅथरिन शाळेत प्रवेश घेतला. पहिलीत असताना ते लाजाळू होते. मात्र, दुसरीत असताना शिक्षकांनी मुलांना १ ते १०० अंकाची बेरीज काढायला सांगितली. गॉस यांनी काही मिनिटात ५०५० असे उत्तर दिले. शिक्षकांनी 'हे उत्तर कसे काढले' विचारल्यावर त्याने पद्धती सांगितली. या अंकांची १००; १ पुढे ९९, २ त्यानंतर ९८,३ अशा अंकाच्या जोड्या घेतल्या तर १०१ बेरीज येणाऱ्या ५० जोड्या तयार होतात. १०१ आणि ५० चा गुणाकार करून ५०५० हे उत्तर काढले. १७८८ पासून त्यांनी मार्टिनो कथॅरिनम ग्रामर स्कूलमध्ये गणित, प्राचीन ग्रीक, लॅटिन विषयांचे अध्ययन केले. बाराव्या वर्षी विद्यापीठपूर्व परीक्षा अभ्यासक्रम पूर्ण केला. त्या काळात त्यांना बुटनर नावाचे शिक्षक शिकवत. त्यांनी गॉस यांना गणिताचे एक पुस्तक सोडवण्यासाठी दिले. त्यांचा अंदाज होता, त्यातील गणिते सोडवण्यास गॉस यांना काही आठवडे लागतील. मात्र, गॉस यांनी पुस्तकातील सर्व गणिते दोन दिवसातच सोडवली; त्यामुळे बुटनर यांची आपल्या शिष्याच्या गणिती कौशल्याबद्दल खात्री पटली. या मुलाला योग्य संधी मिळाली तर हा मुलगा निश्चितच विद्यापीठातील प्राध्यापक होणार असे वाटू लागले.

मात्र, गॉस यांची कौटुंबिक परिस्थिती पाहता हे त्यांना शक्य वाटत नव्हते. त्यांनी गॉस यांच्या वडिलांना शाळेत बोलावून घेतले. त्यांच्याशी चर्चा केली. मात्र, वडिलांना मुलाने काम करून कुटुंबाच्या खर्चासाठी हातभार लावावा असे वाटत होते. आपला मुलगा विद्यापीठातील प्राध्यापक होऊ शकतो हे त्यांना दिवास्वप्न वाटत होते. बुटनर यांनी गॉस यांच्या आईलाही बोलावून घेतले आणि 'प्रयत्न केले तर या मुलाच्या शिक्षणाचा भार कोणी धनिकही उचलू शकतो', हे पटवून दिले. आईने 'तसे प्रयत्न करायला काही हरकत नाही' असे सांगितले. गॉस यांनी आईच्या वतीने ब्रुन्सविकच्या सरदारास याबाबत पत्र लिहिले. ड्युक ऑफ ब्रुन्सविक यांनी गॉस यांच्या गणितातील कौशल्याने प्रभावित होऊन लगेच ही विनंती मान्य केली. ज्यावेळी अर्थसहाय्य मंजूर झाले, तेव्हा गॉस एका विणकराकडे हातमागावर काम करत होते.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

शालेय जीवनातच गॉस यांनी द्वीपदीचा सिद्धांत मांडला होता. तसेच १ ते १०,००० मधील सर्व मूळ संख्या शोधून काढल्या होत्या.

सरदाराकडून मिळालेल्या अर्थसहाय्यानंतर त्यांनी कॅरोलिन महाविद्यालयात प्रवेश घेतला. तेथे त्यांना मार्टिन बर्टेल्स हे शिक्षक गणित शिकवत. गॉस यांचे गणितातील कौशल्य लक्षात आल्यानंतर मार्टिन यांनीही गणिताचा सखोल अभ्यास सुरू केला. त्या अभ्यासाच्या जोरावर मार्टिन विद्यापीठात प्राध्यापक झाले. आठ वर्षांनी मोठ्या असणाऱ्या मार्टिन यांनी गॉस यांच्यासोबत मैत्री केली. या दोघांची मैत्री अखेरपर्यंत टिकून होती. पुढे गॉस यांनी गॉटिन्जन विद्यापीठात प्रवेश घेतला. तेथे गणित शिकणारे गॉस सर्वात लहान विद्यार्थी होते. गॉस यांचे गणितातील ज्ञान अगाध होते, मात्र शिक्षकांसह अनेकजण त्यांची चेष्टा करत. मात्र, तेथील ग्रंथालयात गॉस रमले. ग्रंथालयात त्यांनी भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र, भाषा आणि मानवविद्या शिकण्यावर भर दिला. सर्व ज्ञान मिळवले. मात्र, नेहमीच होणारी चेष्टा पाहून त्यांनी पदवी न घेताच विद्यापीठ सोडले. तरीही सरदाराने अर्थसहाय्य सुरूच ठेवले. पुढे त्यांनी विद्यापीठबाह्य विद्यार्थी म्हणून आपला प्रबंध हेल्मस्टेट विद्यापीठास सादर केला. १७९९ मध्ये विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट पदवी प्रदान केली. या प्रबंधात त्यांनी 'काल्पनिक संख्या सिद्धांत' हा बीजगणितातील मूळ सिद्धांत मांडला.

तसे त्यांचे गणितातील अद्भूत कार्य शालेय जीवनातच सुरू झाले होते. मात्र, १७९२ पासून ते विद्वानांच्या चर्चेत येऊ लागले. १७९२ मध्ये त्यांनी केवळ फुटपट्टी वापरून १७ बाजू असणारी बहुभुजाकृती तयार केली. हा दोन हजार वर्षे प्रलंबित असणारा प्रश्न होता. पुढे त्यांनी ३१ बाजूंची बहुभुजाकृती तयार केली. अखेरची बहुभुजाकृती ९५ बाजूची तयार केली. पुढे ते आपल्या डायरीमध्ये नोंदी करू लागले. त्यांनी १४६ गणितीय संशोधनाच्या नोंदी केल्या होत्या. १७९६ मध्ये एकाच वर्षात त्यांनी ४९ नोंदी केल्या होत्या. ही डायरी गॉस यांच्या निधनानंतर कोणीतरी पळवली, त्यामुळे त्यातील अप्रकाशित नोंदी जगासमोर आल्या नाहीत.

गॉस यांचे शिक्षण पूर्ण झाले तरी सरदाराकडून अर्थसहाय्य येतच होते. त्यामागे गॉस यांना आपले ज्ञाननिर्मितीचे कार्य तसेच करता यावे हा हेतू होता. यातून गॉस यांनी १८०१ मध्ये 'अंकगणिताचा शोध' ग्रंथ प्रकाशित केला. हा ग्रंथ गणिताच्या अभ्यासासाठी परिपूर्ण मानला जातो. या पुस्तकाने संख्याशास्त्राला एक नवी दिशा दिली. गॉस यांच्या अभ्यासाचा आणि बुद्धिमत्तेचा पुरावा म्हणजे त्यांनी पियाझी यांना सिरसचा शोध लावण्यासाठी केलेले सहकार्य मानले जाते. पियाझी यांनी सिरस बटुग्रह शोधला. त्याच्या स्थाननिश्चितीसाठी त्यांचे निरीक्षण सुरू असतानाच ते आजारी पडले. काही महिन्यांच्या खंडानंतरही त्यांना सिरसचे स्थान सापडत नव्हते. गॉस यांनी त्यांना गणिताच्या सहाय्याने स्थान निश्चित करून दिले आणि तो तेथे आढळला.

कोणताही प्रश्न घेऊन गॉस यांच्याकडे जावे आणि उत्तर घेऊन यावे, असा गॉस यांचा लौकिक होता. सर्व काही व्यवस्थित सुरू असतानाच प्रशियन सैन्याने सरदाराचा खून केला. अर्थसहाय्य बंद झाले. मात्र, सिरसच्या शोधातील भूमिकेमुळे त्यांना गॉटिन्जन विद्यापीठात खगोलशास्त्राचे प्राध्यापकपद देण्यात आले. हातमागावरील कामगाराने आपल्या प्रबळ इच्छेनुसार गणित, भौतिकी आणि खगोलशास्त्रातील बहुमोल ज्ञाननिर्मिती करून, 'गणिताचा राजकुमार' अशी आपली ओळख निर्माण केली.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४८००